# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ — साफुपुवि/निवि/791 दिनांक : 22/०८/२०१७

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
संलग्न महाविद्यालये, संलग्न मान्यताप्राप्त
संस्था व आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्था

**विषय : बिगर आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्था गुणवत्ता सुधार योजना व आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्था गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७—१८ साठी फक्त कार्यशाळा/परिषदा आयोजनाकरिता ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याच्या तारखेस मुदतवाढीबाबत.**

**संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र.साफुपुवि/निवि/३६, दिनांक १७/०७/२०१७.**

महोदय/महोदया,

महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांकडून शैक्षणिक वर्ष २०१७—१८ साठी कार्यशाळा/परिषदा यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी सोमवार, दिनांक १७ जुलै, २०१७ ते बुधवार, दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ असा होता.

सदर प्रस्ताव ऑनलाईन सादर करण्याचा कालावधीस मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर **मुदतवाढ दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ अशी राहील.** सदर प्रस्तावाची हार्ड कॉपी **दिनांक ०४ सप्टेंबर, २०१७ पर्यंत** कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे :—

**(unipune.ac.in–Home page–BCUD online–Login–For College Users–College Login & Password–Main Menu- QIP)**

संबंधित महाविद्यालये/संस्थांनी **ऑनलाईन प्रस्तावांची हार्ड कॉपी** अंतिम तारखेपर्यंत नियोजन व विकास विभागामध्ये दिलेल्या मुदतीतच जमा करण्यात यावेत. जमा न केल्यास, तसेच **ऑनलाईन व्यतिरिक्त सादर केलेल्या कोणत्याही प्रस्तावांचा** अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही. तसेच यानंतर प्रस्ताव भरण्याची कोणत्याही प्रकारची मुदतवाढ दिली जाणार नाही त्यामुळे विहित मुदतीतच प्रस्ताव भरुन त्याची हार्ड कॉपी सादर करावी याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

उपकुलसचिव
नियोजन व विकास